NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# "महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास"

**प्रा. डॉ. सत्यवान पुंडलिक बनसोडे,** सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर-पेरीड, ता. शाहुवाडी, जिल्हा. कोल्हापूर
ईमेल आयडी :bansodesatyawan@gmail.com मोबाईल नंबर:- 9850738735

---

**प्रस्तावना:**

महात्मा मोहनदास करमचंद गांधी यांचे स्थान भारतातच नव्हे तर जगात अद्वितीय होते. हे महात्मा गांधीजी चे विरोधक मान्य करतात. ते आदर्शवादी व युगप्रवर्तक नेते होते. साध्य आणि साधना सूचिता हा त्यांच्या विचारांचा गाभा असून अन्यायाचा प्रतिकार सत्य, अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने करता येतो. हे त्यांनी आपल्या विचारातून व कृतीतून दाखवून दिले. महात्मा गांधीजींनी 'यंग इंडिया' या नावाने साप्ताहिक काढून विविध विषयांवर लेखन केले. त्यांनी 'हरिजन' नावाचे बहुभाषीय नियतकालिका सुरू केले. त्यांचे 'सत्याचे प्रयोग' आजही समाजाला दिशादर्शक ठरते.भारतीय आर्थिक विचारवंतांमध्ये गांधींचे स्थान कोणते? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. एका अर्थाने ते अर्थशास्त्रज्ञ नव्हते किंवा त्यांनी अर्थशास्त्र विषयाचा स्वतंत्र ग्रंथ ही लिहिला नाही. परंतु त्यांनी धर्म, राजकारण, अहिंसा, सर्वोदय, ग्रामोद्योग, समाजकारण किंवा एकूणच जीवनाचे जे तत्वज्ञान मांडले त्यातच त्यांचे आर्थिक विचार विखुरलेले आढळतात.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

1) महात्मा गांधीजींच्या जीवन परिचयचा आढावा घेणे.

2) महात्मा गांधी यांची ग्रंथ रचना व त्यांच्या जीवनावरील प्रभावाचा अभ्यास करणे.

3) महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.

**शोधनिबंधाची गृहिते :**

महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार विषयक दृष्टिकोन सर्व समावेशक स्वरूपाचे असून त्यात शेतकरी, बहिष्कृत समाज आणि कामगार अशा समाजातील शेवटच्या घटकांचा विचार करण्यात आलेला आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुतशोधनिबंधामध्ये दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करण्यात आला असून यामध्ये या विषयाशी संबंधित प्रकाशित, अप्रकाशित लिखाण, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासिके, साप्ताहिके व इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

**जीवन परिचय:**

भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या व्यक्तींमध्ये ज्यांचे नाव अतिशय गौरवाने घेतले जाते. अशा थोर महात्म्याचे नाव मोहनदास करमचंद गांधी असे होते. देशातील जनता ज्या व्यक्तीला 'महात्मा', 'राष्ट्रपिता' अशा नावांनी ओळखते. त्यांचा जन्म 2 ऑक्टोंबर 1869 रोजी झाला. शालेय शिक्षण पोरबंदर येथे झाले. पुढे त्यांच्या बंधुनी गांधीजींना शिक्षणासाठी विदेशात पाठविले तेथे त्यांनी कायद्याचा अभ्यास केला. परदेशात पदवी प्राप्त करून आल्यानंतर 1914 मध्ये त्यांनी भारतीय राजकारणात प्रवेश केला. त्यांच्या एकूणच आयुष्यामध्ये त्यांनी जे काही आर्थिक विचार मांडले ते भारतासाठी अतिशय मौल्यवान ठरते. ते विचार सामाजिक, राजकीय व आर्थिक दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचे होते.

**ग्रंथ रचना:**

गांधीजींनी आपले विचार प्रामुख्याने 'हरिजन' व 'यंग इंडिया' या वर्तमानपत्रातून व्यक्त केले. त्यांचे प्रमुख ग्रंथ पुढील प्रमाणे आहेत.हिंदू स्वराज्य, गीताबोध, आत्मकथा, माझे समकालीन, सर्वोदय, मंगल प्रभात, ग्रामसेवा, राष्ट्रवाणी, खादी, आत्मशुद्धी, गीताई, धर्मनिती, नीती धर्म, आरोग्याची गुरुकिल्ली, आश्रमवासीयांकडून, सत्यवीराची कथा, रामनामाचे महत्व आणि सत्याग्रह इत्यादी.

**महात्मा गांधीजींवरील प्रभाव:**

महात्मा गांधीजींवर पुढील व्यक्तींचा व ग्रंथांचा प्रभाव पडला होता यामध्ये थोरो, टॉलस्टॉय, जॉनरस्किग, ना. गोखले, भगवदगीता, उपनिषदे, संत कबीर, मीराबाई आणि गुरुनानक इत्यादी.

**महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार:**

राष्ट्रपिता महात्मा गांधी हे एका अर्थाने अर्थशास्त्रज्ञ नव्हते आणि त्यांनी अर्थशास्त्रविषयक स्वतंत्र ग्रंथही लिहिलेला नाही. महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार हे त्यांच्या नैतिक व अध्यात्मिक सिद्धांतावर आधारित आहेत. त्यांचे आर्थिक विचार पुढील मुद्द्यांच्या आधारे अभ्यासता येतील.

**१) ग्रामस्वराज्य विषयक विचार :**

गांधी अर्थशास्त्राचा ग्रामस्वराज्य आणि स्वावलंबन हा गाभा होता. गांधीजींना अन्न, वस्त्र, निवारा आदी संदर्भात प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण अपेक्षित होते. खेड्यांचा विकास या तत्त्वावर गांधीजींचे अर्थशास्त्र अवलंबून आहे. त्यांच्या मते, जर खेड्यांचा विकास झाला तरच देशाचा विकास होईल. भारताच्या सर्वांगीण विकासासाठी गांधींनी ग्रामीण विकासावर भर दिला. त्यांनी ग्रामराज्य ही संकल्पना मांडली. ग्रामस्वराज्य म्हणजे आदर्श खेडे ही खेडे कशा प्रकारे असावे त्याबद्दल गांधीजींनी पुढील प्रमाणे शर्ती सांगितल्या आहेत. भारतातील खेड्यांची रचना ही नियोजित असावी, खेडी स्वावलंबी व स्वतंत्र असावीत, आर्थिकदृष्ट्या खेडी ही स्वयंपूर्ण असावीत, खेड्यांमध्ये आरोग्यविषयक सोयीसुविधा असाव्यात, खेड्यातील शेती व्यवसाय प्रगत असावा, खेड्यांमध्ये शिक्षणाच्या मूलभूत सोयी सक्तीच्या असाव्यात, खेड्यांमध्ये पाणीपुरवठ्याची व्यवस्था असावी, खेड्यातील सर्व व्यवहारहे सार्वजनिक उपक्रमांद्वारे चालवावेत, खेड्यातील उत्पादनस्थानिक बाजारपेठेलाच उपलब्ध व्हावीत, खेड्यांमध्ये जातिव्यवस्था असू नये आणि प्रत्येक खेड्यात फुले, फळे इत्यादी झाडे असावीत इत्यादी प्रकारच्या अटी आदर्श खेड्यांच्या संदर्भात गांधीजींनी सांगितली आहेत.

**२) स्वदेशीविषयक विचार:**

महात्मा गांधीजींनी आपले विचार मांडताना 'स्वदेशी' या संकल्पनेचा आग्रहाने पुरस्कार केला. त्यांच्या मते, प्रत्येक भारतीयांनी स्वदेशीचा आग्रह धरला तर देशातील उद्योगांना चालना मिळेल. विदेशातून भारतात येणाऱ्या वस्तूंचे आक्रमण थांबविता येईल. परदेशी वस्तूंची मागणी कमी झाल्यामुळे परदेशात जाणारी संपत्ती थांबेल. ती आपल्या देशातच राहील त्याचा वापर देशाच्या विकासासाठी करता येऊ शकेल. म्हणून प्रत्येक भारतीयांनी भारतात तयार होणाऱ्या वस्तूंचाच वापर करावा असे मत गांधीजींनी मांडले.

**३) पंचायत राज्य विषयक विचार :**

महात्मा गांधीजींनी आदर्श पंचायत राज्य व्यवस्थेची कल्पना मांडली. त्यांच्या मते ग्रामीण भागाच्या विकासामध्ये पंचायत राज्य व्यवस्था महत्त्वाची भूमिका पार पाडते. यामध्ये ग्रामीण समाजाची एकता दिसून येते. ग्रामीण भागासाठीच्या विविध योजना आणि त्यासाठी लोकांचे सहकार्य यातूनच ग्रामीण भागाचा कायापालट होण्यास मदतच होते. गांधीजींच्या मते ग्रामीण भागाच्या विकासातूनच देशाचा विकास होईल. त्यासाठी ग्रामीण भागातील पंचायत राज्य व्यवस्था बळकट केली पाहिजे.

**४) श्रम विषयक विचार:**

भारतातील वाढती लोकसंख्या विचारात घेता भारतात श्रमप्रधान उत्पादन पद्धती असावी. त्यांनी मानवी श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्या मते, वकील किंवा न्हावी या दोघांच्याही कामाची किंमत सारखीच असली पाहिजे. त्यासाठी मोठ्या उद्योगांऐवजी उद्योगांचे विकेंद्रीकरण करून छोटे- छोटे उद्योगधंदे काढले पाहिजे.

**५) विश्वस्त कल्पनेविषयी विचार:**

महात्मा गांधीजींच्या इतर विचारांपेक्षा विश्वस्त कल्पनेविषयी विचार फार महत्त्वाचा वाटतो. कारण जगामधील प्रत्येक राष्ट्रात आर्थिक विषमता असते. ही आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी भांडवलदार व श्रीमंत वर्गाने आपल्याला आवश्यक तेवढी संपत्ती जवळ बाळगावी. राहिलेली संपत्ती समाजातील गरीब वर्गाला उद्योगधंदे

काढून देण्यासाठी वापरावी. त्यामुळे समाजातील आर्थिक विषमता नाहीशी होईल असे मत गांधीजींनी विश्वस्त संकल्पना मांडताना नोंदवले.

**६) रोजगार विषयक विचार :**

महात्मा गांधीजींच्या मते स्वदेशी चळवळ देशाच्या रोजगारनिर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडते. स्वदेशी तत्त्वामुळे देशातील लोकांनी देशातच निर्माण झालेल्या उत्पादनाला मागणी निर्माण केल्यामुळे देशातील उद्योग स्वावलंबी बनतील. परिणामी, देशात संपत्ती निर्माणाला चालना मिळेल. कारण अधिकाधिक रोजगार निर्माण होणे हे देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते.

**७)खादी आणिग्रामोद्योग:**

महात्मा गांधीजींच्या म्हणण्यानुसार खादी उद्योग हा एक ग्रामीण भागातील फार महत्त्वाचा उद्योग समजला जातो आणि चरखा हा सर्व ग्रामोउद्योगांचा केंद्रबिंदू आहे. त्यांच्या मते प्राचीन काळात भारतात हस्तकला वस्तू आणि कापड ग्रामीण भागातच तयार होत असे. जागतिक क्षेत्रात या वस्तूंना प्रचंड मागणी होती. जगात भारतीय वस्तू श्रेष्ठ समजल्या जात असत.ग्रामोद्योग हे रोजगार मिळवून देण्याच्या दृष्टीने व जनतेचे दारिद्र्य दूर करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेतच, पण ते जनतेला सकस व सत्वयुक्त आहार मिळून देण्याच्या दृष्टीनेही फायद्याचे आहे. म्हणून भारतातील प्रत्येक खेडेगावात असे उद्योग सुरू झाले पाहिजेत असे महात्मा गांधीजींनी सांगितले आहे.

**८) बेरोजगारी विषयक विचार :**

महात्मा गांधीजींनी विकेंद्रीकरणाचे महत्त्व पटवून देताना देशातील बेरोजगारीची समस्या महत्त्वाची मानली. देशातील उग्र स्वरूपाच्या बेकारीमुळे अनेक आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रश्न निर्माण होतात. उद्योगाच्या विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून बेकारीचा प्रश्न सुटू शकतो यावर गांधीजींचा ठाम विश्वास होता.

**९) सर्वोदय विषयक विचार :**

महात्मा गांधीचे सर्वोदय तत्त्वज्ञान सर्वांचा विचार करते. सर्वांचा उदय म्हणजे सर्वोदय असे म्हणता येईल. संकुचित भावनेचा त्याग करून सर्वांचा विचार करणे म्हणजे सर्वोदय होय. थोडक्यात महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांचा आशय सर्वोदयी आहे.

**१०) भारतीय अर्थरचनेचा अभ्यास :**

महात्मा गांधीजींचा भारतीय अर्थरचनेचा सखोल अभ्यास असल्यामुळे त्यांनी देशाला विकेंद्रीकरणाचे महत्त्व पटवून दिले. ग्रामीण भागाचा विकास आणि खेड्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी संपन्न शेती, उद्योगांचे विकेंद्रीकरण आणि लहान प्रमाणावरील सहकारी संस्थांचे व्यवस्थापन यावर अधिक भर दिला. महात्मा गांधीजींना विकेंद्रीकरणाचा वेगळा अर्थ अभिप्रेत होता. त्यांच्या मते विकेंद्रीकरण म्हणजे वेगवेगळ्या ठिकाणी लहान प्रमाणावरील उत्पादन आणि लोकांच्या घरांमध्ये केले जाणारे उत्पादन होय.

**११) वारसा हक्क विषयक विचार :**

गांधीजींच्या मते सर्व प्रकारचा वारसा हक्क देशाकडे असला पाहिजे आणि माणसाच्या खर्चावर निर्बंध घातले पाहिजे तरच उत्पन्नाच्या विषमतेचा प्रश्न सुटू शकतो. वारसा हक्काबाबत लिहितांना गांधीजी श्रीमंत लोकांना असे सांगतात की, त्यांनी आपल्या मुलांना योग्य प्रकारे वाढवून असे शिक्षण द्यावे की स्वतःच्या पायावर ती उभे राहण्यास शिकतील.

**१२) सहकार विषयक विचार :**

महात्मा गांधीजींच्या मते देशाची प्रगती करावयाची असेल तर सर्वांच्या सहकार्याने करता येते. सहकार चळवळ हा लोकशाही पद्धतीचा एक गाभा असल्याने या चळवळीच्या विकासात महात्मा गांधी यांनी मोठे योगदान दिले. सहकार चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला चालना देता येते यावर महात्मा गांधीजींचा विश्वास होता.

**१३) शेतीवर आधारित अर्थव्यवस्था :**

महात्मा गांधीजींच्या मते, भारताची अर्थव्यवस्था शेतीवर आधारित असावी. भारत कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे शेतीपासून निघणाऱ्या कच्च्या मालावर आधारित उद्योग निर्माण झाले पाहिजेत. ज्या ठिकाणी कच्चा माल निर्माण होतो. त्याच ठिकाणी उद्योगास परवानगी दिली जावी. त्यामुळे त्या क्षेत्रातील बेकारीचा प्रश्न सुटेल. दळणवळणाचा आणि मजुरीचा खर्च कमी लागल्यामुळे उत्पादित वस्तूंची किंमत कमी राहील. ग्रामीण स्तरावर उद्योगांचे केंद्रीकरण केल्यास विविध प्रश्न सुटतील.

**१४) संपत्तीच्या केंद्रीकरणा विषयक विचार :**

महात्मा गांधीजींनी विकेंद्रीकरणात अपेक्षित धरलेली यंत्रसामग्री ही प्राथमिक स्वरूपाची होती, जी लहान उद्योगांमध्ये वापरणे शक्य होते आणि त्यासाठी लागणारे भांडवल ही कमी असणे सयुक्तिक होते. उद्योगाच्या विकेंद्रीकरणामुळे समन्यायी वितरण व्यवस्था शक्य असल्याने व संपत्तीच्या केंद्रीकरणाला प्रतिबंध बसत असल्याने देशात स्वराज्याचे स्वप्न साकार करण्याचे प्रभावी साधन म्हणून महात्मा गांधीजींनी विकेंद्रीकरणाचा विचार केला.

**१५) वर्ग समन्वय :**

महात्मा गांधीजींनी जे आर्थिक विचार मांडले आणि विशेषतः त्यातून सर्वांगीण ग्रामीण विकासासाठी जे विचार मांडले त्यात वर्ग समन्वयाची कल्पना अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. गांधीजींचे असे मत होते की, प्रत्येक वर्गाने दुसऱ्या वर्गाशी खेळीमेळीने, गुन्हा गोविंदाने राहावे आणि समन्वयाचा मार्ग शोधावा, संघर्ष, रक्तपात हिंसा या मार्गानी भांडवलदारांचा नायनाट होणे शक्य नाही यासाठी दोन्ही वर्गातील समन्वय अत्यंत आवश्यक आहे. थोडक्यात गांधीजींनी भांडवलदार आणि गरिबी यात समन्वयासाठी हृदय परिवर्तनाचा मार्ग सांगितलेला आहे.

**निष्कर्ष :**

गांधीजींचे विचार आदर्शवादी आहेत. त्यात ग्रामस्वराज्य, श्रम, विश्वस्त, स्वदेशी, खादी व ग्रामोद्योग, बेकारी, विकेंद्रीकरण, अर्थरचना, सर्वोदय, वारसा हक्क, वर्ग समन्वय, पंचायत राज्य, सहकार आणि रोजगार इत्यादींचा समावेश होतो. आज चंगळवाद संस्कृती आहे यामध्ये आर्थिक, सामाजिक व राजकीय शोषण आढळते. प्रत्येकाला भौतिक सुखाची लालसा आहे. जागतिकीकरणामध्ये गळेकापू स्पर्धा निर्माण झाली आहे. या अनिष्ट बाबींना पायबंद घालण्यासाठी गांधीजींचे विचार मार्गदर्शक ठरणारे आहेत. समाजातील आर्थिक विपन्नावस्था आणि सामाजिक दृष्ट्या उपेक्षितवर्गा विषयी, त्यांच्या उत्कर्षा विषयी गांधीजींची तळमळ त्यांच्या विचारसरणीत आढळते. गांधींनी आर्थिक आदर्शवादाचा उपयोग केला. स्वदेशी वस्तूंचा वापर आणि विदेशी वस्तूंवर बहिष्कार हे सूत्र गांधीजींनी भारतीयांना आत्मसात करावयास सांगितले साम्राज्यशाहीचे आर्थिक खच्चीकरण करण्यासाठी व स्वदेशी उद्योगांचे संरक्षण करण्यासाठी स्वदेशी विचार उपयुक्त ठरला आहे. प्रा. अंजरिथा यांच्या मते गांधीवाद हा समाजातील विकेंद्रीत जीवनाची साधी कल्पना व अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि विज्ञान यांना असणारी मागणी यांचा समावेश आहे. भारतासारख्या राष्ट्राला गांधीवाद आजही उपयुक्त आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) खंदारे सुखदेव, “ भारतीय आर्थिक विचारवंत ”, कैलाश प्रकाशन, औरंगाबाद, २०१६.

२) पाटील, म्होपरे, वाईंगडे आणि यादव, “ आर्थिक विचारांचा इतिहास”, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०२१.

३) कुलकर्णी आणि ढमढेरे, “ आर्थिक विचार व विचारवंत ”, डायमंड प्रकाशन, पुणे, २०११.

४) पाटील वा. भा., “ आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत ”, प्रशांत प्रकाशन, जळगाव, २०१३.